मासिकांक २२

# "ती"चं पान

## तिच्याकडून सगळ्यांसाठी



संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

## संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

## अतिथी संपादक: सौ. सुषमा (देशपांडे) मुलमुले

## अंक मांडणी व सजावट: अक्षय देशपांडे


## संपर्क

७३७८४९९९७७

tichapaan@gmail.com

facebook.com/tichapaan

www.tichapaan.com

@tichapaan


टीप: या अंकात प्रकाशित झालेल्या लेखनाशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. प्रस्तावना

सायली देशपांडे ........................................ ४

२. गाभारा

कुसुमाग्रज ............................................... ६

३. आपल्यातलं नातं

प्राजक्ता बर्वे ............................................ ८

४. चुकलेला प्रवास

स्नेहा जोशी ............................................... ९

५. श्रावणात घननिळा बरसला

वर्षा पतके थोटे ........................................ ११

६. काशिनाथ आजोबा

संध्या दुर्गे ................................................ १३

७. मराठीच्या संवर्धनासाठी आणि मराठीजनांच्या प्रगतीसाठी!

दीप्ती शिंदे दळवी ................................... २०

८. प्रेम

मैथिली अंजनकर .................................. २३

९. पेट्रोग्लिफ्स (कातळ शिल्प)

निता प्रकाश ..................................... २४

१०. "मी" मराठी

दिशा राजकारणे टिकेकर ................. २७

११. जे मला वाटतंय ते तुला ही वाटतंय का?

पल्लवी माने ...................................... २८

# प्रस्तावना

## सायली अक्षय देशपांडे

फेब्रुवारी महिना म्हंटला की आवर्जून आठवतो तो प्रेम सप्ताह,प्रेम दिवस..! पण या एकाच गोष्टीपुरता हा महिना मर्यादित नाही. तर याबरोबरच येतो तो मराठी भाषा दिन..! आपल्या लाडक्या कुसुमाग्रज अर्थात वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस.

मराठी साहित्य विश्वात शिरवाडकर म्हणजेच मराठी भाषा असं जणू समीकरणच निर्माण झालं आणि आजही तसंच आहे. भाषा माणसाला समृद्ध करते. मग ती कुठलीही असो. पण ज्याप्रमाणे आई जास्त जवळची असते तसेच आपली मातृभाषा आपल्या जास्त जवळची. अर्थातच मराठी. या मराठी भाषेत असंख्य कवी, कवयित्री होऊन गेलेत. त्यांनी काय शिकवलं तर भाषेवर प्रेम करायला शिकवलं. त्यातलं सौंदर्य बघायला शिकवलं. उगीच नाही प्रेम दिवस म्हंटला की आधी ' प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं' ही पाडगावकरांची कविता ओठी येते!!

अगदी पिढी कुठलीही असली तरी प्रेम कर भिल्लासारखं बाणावरती खोचलेलं असं म्हणत आपल्यातला कवी, कवियत्री जागी होते.या कवितेच्या विश्वातील एक प्रेमयुगच जणू काही या सगळ्या मान्यवरांनी निर्माण केलं. हे सगळं असतांना प्रेम हे फक्त तिच्यावर किंवा त्याच्यावरच करावं का? असा प्रश्न निर्माण झाला तर माझ्यापुरतं तरी याचं उत्तर नाही असं असेल. मराठी भाषा दिन यादिवशीच फक्त मोठमोठी भाषणं देऊन एक दिवसाचं प्रेम न व्यक्त करता आपली मातृभाषा कशी जपल्या जाईल, तिचं जतन आपण कसं करु शकतो याबद्दल विचार करुन तो प्रत्येकाच्या मनात रुजवणं आपल्या भाषेबद्दल प्रेम निर्माण करून तिचा आदर करणं हे सुद्धा एका प्रेम दिवसापेक्षा नक्कीच कमी नाही.

भाषा, देश याहीपेक्षा मोठं म्हणजे राष्ट्र. आपली संस्कृती आपल्याला शिकवते की विचार व्यापक

असावा, विशाल असावा. मग या न्यायाचे पालन करून राष्ट्रप्रेम केलं तरी ते उत्तमच..!

हा अंक सर्वांगसुंदर करणाऱ्या श्री अक्षय देशपांडे यांचे सुद्धा आभार.! हा अंक आपल्याला नक्की आवडेल अशी आशा व्यक्त करते आणि माझ्या लेखणीला विराम देते.

सगळ्यांना प्रेम दिवस आणि मराठी भाषा दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा...!

# गाभारा

## कुसुमाग्रज

दर्शनाला आलात? या..

पण या देवालयात, सध्या देव नाही

गाभारा आहे, चांदीचे मखर आहे.

सोन्याच्या सम्या आहेत, हिऱ्यांची  झालर आहे.

त्यांचही दर्शन घ्यायला हरकत नाही.

वाजवा ती घंटा, आणि असे इकडे या

पाहीलात ना तो रिकामा गाभारा?

नाही..तस नाही, एकदा होता तो तिथे

काकड आरतीला उठायचा, शेजारतीला झोपायचा,

दरवाजे बंद करुन, बरोबर बाराला जेवायचा

दोन तास वामकुक्षी घ्यायचा

सार काही ठीक चालले होते.

रुपयांच्या राशी, माणिक मोत्यांचे ढीग

पडत होते पायाशी..

दक्षिण दरवाज्याजवळ,

मोटारीचे भोंगे वाजत होते

मंत्र जागर गाजत होते

रेशीम साड्या, टेरीनचे सुट समोर दुमडत होते.

बँकेतले हिशेब हरीणाच्या गतीने बागडत होते.

सारे काही घडत होते.. हवे तसे

पण एके दिवशी.. आमचे दुर्दैव

उत्तर दरवाज्याजवळ अडवलेला

कोणी एक भणंग महारोगी

तारस्वरात ओरडला “बाप्पाजी बाहेर या”

आणि काकड आरतीला आम्ही पाहतो तर काय

गाभारा रिकामा

पोलीसात वर्दी, आम्ही दिलीच आहे..

परत? कदाचित येइलही तो

पण महारोग्याच्या वस्तीत, तो राहिला असेल तर

त्याला पुन्हा..

प्रवेश द्यावा की नाही, याचा विचार करावा

लागेल,

आमच्या ट्रस्टींना,

पत्रव्यवहार चालु आहे.. दुसऱ्या मूर्तीसाठी

पण तुर्त गाभार्यांचे दर्शन घ्या.

तसे म्हटले तर, गाभार्यांचे महत्व अंतिम असत,

कारण गाभारा सलामत तर देव पचास.

# आपल्यातलं नातं

**प्राजक्ता बर्वे**



आपल्यात पुढे काय नातं निर्माण होईल माहीत नाही!

मित्र, सखा, प्रियकर, सहचारी की सर्व काही?

नात्याला आपण आपल्या कोणतंच नाव नको द्यायला

नाहीतर ना सगळं कसं लगेच टिपीकल  लागतं व्हायला

काळ सरेल, त्याच्या सोबत आपण सुध्दा सरत जाऊ

मात्र एकमेकांवर निस्सीम प्रेम करत राहू

सगळ्या चवी नात्यात अपुल्या निरंतर असुदेत

पण ठळकपणे त्याच्यात गोड गोडवा दिसू देत

चुका घडल्या तरी त्याचा हिशेब ठेवायला नको नंतर

एकमेकांच्या सोबतीने पार करु पूर्ण अंतर

चल आता समोर ये आणि मला पटकन भेट

आढेवेढे नकोच मुळी विचारून टाक सगळं थेट

शिशिरात गळलेलं झाड, वसंतात कसं बहरतं!!

अगदी तसंच बहरेल, फुलेल आपल्यात आपलं स्पेशल नातं!!

# चुकलेला प्रवास

स्नेहा जोशी



परत एकदा थोडक्यात चुकामुक झाली आणि दृष्टिक्षेपात आलेली टॅक्सी अचानक एकाजणाने हात केल्याबरोबर थांबली आणि त्याला घेऊन निघूनही गेली, ती स्वतःवरच चरफडत एका हाताने साडी आणि दुस-या हाताने छत्री सावरत पाण्याने ओथंबलेल्या रस्त्यावरुन चालू लागली.

गेल्या तासभराच्या पावसाने आधीचं ती कंटाळलेली, त्यात एकटी, कधी नव्हे ती साडीत बाहेर पडलेली, सगळं त्रांगडं आज व्यवस्थित जुळुन आलं होतं आणि ही बिचारी फसली होती. बसस्टॉपवर पोहोचता पोहोचता तिने छत्री बंद केली आणि हातातल्या पर्समधला मोबाईल बाहेर काढला. नशीब! याने तरी आज साथ दिली म्हणायची, ती बॅटरीच्या फुल चार्चिंग चा सिम्बोल पाहुन स्वतःशीच पुटपुटली. मोबाईल ऑन करताच तिने व्हॉट्सअपला मेसेज टाईप करायला सुरुवात केली.

खरं तर तिला आज प्रत्यक्ष भेटूनच सगळं सांगायचं होतं. 'त्या'ला ब-याच साठलेल्या अव्यक्त भावनांना वाट मोकळी करुन द्यायची होती. त्यासाठीच आजचा भेटप्रपंच ठरला होता. नव्हे तिनंचं ठरवला होता. मोठ्या मिन्नतवारीनं त्याला तिनं तयार केलं होतं. कामाच्या व्यापात असलेला 'तो',खरं तर तिचा जीव की प्राण. तो म्हणेल तसं राहणं, आवरणं सारं काही ती हौसेनं करत असे. त्याला ही ती खूप आवडायची पण मुळातच शांत स्वभाव असलेला तो, कामाच्या व्यापापुढं सारं काही मागं टाकायचा, अगदी तिलासुद्धा त्याच्याकडून सारं काही मिळायचं.

एक त्याची वेळ सोडली तर सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत तिच्या मेसेजेसला उसंत नसायची. जेवलास का? , झोपलास का?, उठलास का?, अगदी सगळं सगळं तो वेळ होईल तसा रिप्लाय द्यायचा. ही वाट बघून बघून कंटाळून जायची. कधी कधी खूप रागही यायचा पण चिडणं, रागावणं झालं की, माणसं समजूत घालण्याऐवजी दूर निघून जातात, हे तिनं आयुष्यात कैकदा अनुभवलेलं होतं त्यामुळेचं याच्याबाबतीत तिला कुठलीचं रिस्क घ्यायची नव्हती आणि म्हणूनच ती गप्प होती.

पण आज मात्र तिची सहनशीलता संपली. म्युच्युअल फिलींगने सुरु झालेलं त्यांचं नातं आता जवळपास तीन वर्षांच्याही पुढं गेलं होतं पण लग्नाच्या बाबतीत गाडी काही पुढं सरकत नव्हती किंबहुना हाच जरा थांब करायचा. ऐन उमेदीतला सेटल बिझीनेस उत्तम चालू असताना त्याला संसाराची जबाबदारी घ्यायला सध्या तरी नको वाटतं होतं.

संध्याकाळी ६ ला भेटू असं ठरलेलं असतानाही, जवळपास दोन तास वाट पाहून ही तो आलाच नाही. कुठल्याशा महत्वाच्या कामासाठी बाहेर जातोय, असा तोंडदेखला मेसेज टाकून तो निघाला होता.तेव्हा घड्याळात आठ वाजून गेले होते आणि बाहेर धुवाधार पावसाला सुरुवात झालेली होती. बराच वेळ थांबूनही जेव्हा पाऊस थांबण्याची लक्षणं दिसेनात, तेव्हा तिने छत्री उघडली आणि घराकडचा रस्ता धरला. सकाळपासूनच सगळं चित्र तिच्या डोळ्यासमोर सरकत होतं. भेटण्याची उत्सुकता, प्रेमाची अगतिकता अधीरता ओसरत ओसरत, त्याचा मेसेज आल्यानंतरचा राग, हतबलता, सारं काही पापण्यांच्या काठाला साचलं होतं. बाहेर पाऊस कोसळतानाही तिच्या डोळ्यांतून नकळतपणे अश्रूंची बरसात झालीच.

त्याच भरात तिने मेसेज टाईप करायला सुरुवात केली,

"वक्त होता गर मुकर्रर तो,

कुछ हमारी भी सुन लिये होते

जाते जाते एक बार ही सही,

हमें सिने से लगाकर जाते

आज हो गये आप हमारे लिए अजनबी,

देखिए जमाने भर में ढुँढ के,

जो एक बार चले गये,

तो फिर कभी लौटके नही आते”

मोठ्या निर्धाराने तिनं सेंड ऑप्शनवर क्लिक केलं आणि तेवढ्याचं ठामपणे पुढच्या प्रवासाला निघाली, कधीही मागे वळून न पाहण्यासाठी.

त्याने मोबाईलवर मेसेजचे नोटिफीकेशन पाहिले. रिप्लाय द्यायचा म्हणून मेसेज ओपन केला, तोपर्यंत फार उशीर झालेला होता !

# श्रावणात घननिळा बरसला



## वर्षा पतके थोटे

गावात मारोतीच्या पारावर एक भलंमोठ्ठं चिंचेचं झाड होतं. तिथं मारोतीच्या मंदिरातला पुजारी आम्हाला झोके टांगून देत होता. मग आमचा मुक्काम सुट्टीच्या दिवशी त्या झोक्यावरच असे. अधे-मधे भूक लागली तर घरी जाऊन यायचं आणि नाहीच तर चिंचेचा पाला खायचा. लागतो खूप छान चिंचेचा पाला आंबटगोड. उन्हाळ्यात जर चिंचेच्या झाडाला लदबद लदबद चिंचा आल्या तर मजाच मजा. पण मग त्या वर्षी आंबे कमी यायचे. कच्चे आंबे खाण्याची वेगळी मजा असायची आणि चिंचा खाण्याची वेगळी मजा असायची. उन्हाळा संपला की मग पावसाळा सुरु होई. त्याकाळी आठ आठ दिवसाची झडी लागत असे. इतकी की शाळेतसुद्धा जाऊ शकत नव्हतो. खायचं - प्यायचं अन् दुलईत जाऊन झोपायचं. मला पाऊस आवडतोच पण झडी लागली की मला आवडायची नाही.

श्रावण महिन्यात तर विचारूच नका नागपंचमीला पाऊस सुरु झाला की आई म्हणायची नागोबाचा फणा ओला करायला पाऊस आला , पोळ्याला पाऊस आला की म्हणायची बैलांचे शिंग ओला करायला पाऊस आला. प्रत्येक सणाला जशी त्याची उपस्थिती प्रार्थनीयच होती. मला मोठं नवल वाटे की या पावसाला हे सणवार कळतात तरी कसे ? कोण बरं सांगत असेल? मला पावसातल्या झडीचा खूप राग यायचा. एकतर झुल्यावर झोके घ्यायला मिळायचे नाहीत आणि सर्वात महत्वाचं म्हणजे बकुळीची फुलं पार धुळीस मिळत. माझं आवडतं फुलं पण मला ते या झडीच्या दिवसात मिळायचेच नाही.

एका वर्षी चांगली पंधरा दिवसाची झडी लागली. गावात कोणी कोणाला दिसेना. पाऊस सुरु झाला त्या पहिल्याच दिवशी मुसळधार पावसात बकुळ पूर्ण कोसळला होता. पंधरा दिवस त्याला झडीमुळे पाहताही आलं नाही. मनात खूप दाटून यायचं धावत जाऊन बकुळ पाहून यावा. त्याला शेवटचं डोळाभर पाहावं. पण काही पर्यायच नव्हता. त्यावर्षी खूप नुकसान झालं होतं. गावातली गुरं-ढोरं मेली, कुणीतरी भिंत खचून मेलं. पण मग पुढे मोठे झाल्यावर शिक्षण संपलं आणि

आयुष्याचा दोर कधी जोरात तर कधी हळू झोके द्यायला लागला.  आयुष्यात निळ्या काळ्या ढगांबरोबर पांढरे ढगही अनुभवलेत. चिंचेचं झाड आयुष्यभर सोबत नाही करत कारण चिंच खाण्याचं एक वय असतं. ते निघून गेलं की चिंचेचं झाडही मनातलं हळूहळू धुसर होत जातं. पण मनात घर करून असलेला तो बकुळ आजही सदैव आनंदाच्या क्षणी गंधीत करतो. पण निराशेच्या क्षणी मात्र मला तो पावसाच्या झडीतला बकुळ भासतो. श्रावणात घन निळा बरसला हे गाणं लागलं की मला माझ्या मनातला बकुळ प्रकर्षाने आठवतो. यावर्षी श्रावणात मात्र खूप पाऊस आला आणि मी लावलेलं बकुळीचं रोपटं मातीत छान रुजलं. त्यामुळे माझ्या मनातलाही  बकुळ छान फुललाय आणि तनामनाला गंधीत करतोय. ख-या बकुळफुलाच्या प्रतिक्षेने......

# काशिनाथ आजोबा



## संध्या दुर्गे

सर्जरी वॉर्डचा कॉल आला म्हणून मी वॉर्डकडे निघाली. मनात विचार हाच की, मोडका तोडका, लंगडा पेशंट घरी नेणे कठीण. म्हणूनच त्याचे नातेवाईक सोडून पळून गेले असतील. त्याशिवाय माझी कोण आठवण काढणार ? चला कर्तव्यावर असा विचार करीतच मी वॉर्डमध्ये पोहचली. ”काशीनाथ, खूप छान आहे मॅडम त्याला घरी पाठवा लवकर ! इति वॉर्डच्या इन्चार्ज सिस्टर - ज्यांना नेहमीच पेशंटला घरी पाठविण्याची घाई असते. आणि त्यांच्या करीता सगळे नातेवाईक सोबत नसलेले पेशंट घरी पाठविण्याकरीता चांगलेच (चांगल्याच अवस्थेत) असतात.

“अहो सिस्टर, आधी मला पेशंट दाखवा नं मी तो कसा आहे बघते मग बोलते सगळं”

तोपर्यंत काशीनाथ आजोबा, आपल्या पिशवी कम पोत्यासह येऊन पोहचले होते. अजूनही चालतांना झोक जात होता. पण आपली पिशवी सोडायची नव्हती. कपाळावर अजून पूर्ण बरी नसलेली जखम होती. वय वर्षे जवळपास ७०-७५. अंगावरचे कपडे मळलेले. पण माझे स्वतःचे कपडे आहेत हे ते सांगत होते. उन्हातान्हात रापलेला शरीराचा रंग, आवाज मोठा आणि खणखणीत. वॉर्डातील मामांनी तोल जातो म्हणून हात दिला तर, “अरे हाट ! मला कोणाचा आधार नको म्हणून हात ढकलून दिलेला.”

“ मी स्वतःच घरी जातो” असा हेका कायम ! मी त्यांचे नाव आणि प्राथमिक माहिती घ्यायचा प्रयत्न केला. मात्र तिथे हा आवाज एकदम नरमला. ”सर्वच हायेत माझ्या घरी“ मी ............... गावात राहतो. परत एकदा आजोबा सर्वच म्हणजे कोण कोण आहेत ? हे मात्र सविस्तर सांगत नव्हते.

“मी जातो माहा एकला“ - काशीनाथ आजोबा”

“पण तुमची तब्येत बरी नाही, कसे जाणार एकटे”- मी

“मले गाडया माहीत आहे. जातो एस टी नं ,लागलं तं हाल्टींगची गाडी पायतो.”

“जा तुम्ही तुमचे एकटे, पण मला मुलीचे नाव सांगा”

....... ..... आणि ती ................ या गावी राहते" मी खुश. कारण नाव पत्ता शोधायला सोपे आणि जवळचे वाटले. आता दुस-या मुलीचे नाव पत्ता सांगा, मग मुलींना बोलवून घेते.

"दुसरीचे नाव ........ ......, ती ......... या गावी राहते" अरे ! हे तर पहिल्या मुलीचे नाव आहे.

"ते तेच आहे" जास्त काही बोलू नका आम्हीही कामाचे आहे. नसली बायको तर काय झालं? "जास्त छेडाल तर पाहून घ्या" आजोबा थांबायचे नाव घेत नव्हते. त्यांचा अविर्भाव भांडणाचा होता. संतापाचा होता. घरच्यामाहिती बाबत ते सांगायला तयार नव्हते.

शांत आहेत असे वाटत असतांना पुन्हा एकदा पत्नी, मुली, भाऊ बहीण या विषयावर विचारून पाहिले पण त्यांचा प्रतिसाद तसाच होता. कदाचित घरच्यांवर नाराज होऊन बाहेर पडले असतील, कदाचित कोणी फसविले असेल, कदाचित मुले - मुली नीट वागवत नसतील, कदाचित यांचा स्वभावच असा असेल. आम्ही एक एक तर्क लावित होतो. पोलीसांना त्यांच्या मुलीचा शोध करण्यास सांगून आम्ही सगळे आपापल्या कामात गुंतलो. मात्र आजोबांना त्यांची घरी जाण्याची सोय करणार, या बाबतीत त्यांना आश्वस्त करुनच.

आपली पिशवी छातीशी धरूनच ते आपल्या बेडवर गेले. त्या पिशवीत काय आहे हे मात्र ते बघू देत नव्हते. बोलतांना पिशवी बाजूला होती तेंव्हा त्यात कपडे, प्लॅस्टिक पॅकेटस्, काही कचरा, बॉटल हे दिसत होते. मात्र अतिशय घाण वास येत होता. कदाचित खाण्याचे पदार्थ त्यात होते.

बराच वेळ वाट पाहूनही. पोलीसांकडून आजोबांच्या लेकी विषयी काहीच माहिती आली नाही. दुस-या दिवशी सकाळी येऊन बॅग ठेवत नाही तोच फोन खणखणला. परत वॉर्ड मधून फोन आला होता.

- "मॅडम, लवकर वॉर्डमध्ये पोहचा, it's urgent

- "सिस्टर नीट सांगा काय झाले ते"

- "काशीनाथ आजोबा, खूप त्रास देत आहेत. घरी जाण्याकरीता हट्टीपणा करीत आहेत. जाऊ दिले नाही म्हणून वस्तू फेकफाक करीत आहे. चिडचिड करीत, शिव्या देत बोलताहेत. आणि रात्री तर खिडकीतून उडी मारुन आत्महत्येचा प्रयत्न करीत होते."

क्षणाचाही विलंब न लावता मी लवकरच फोन ठेवून त्यांच्या वॉर्ड कडे निघाली. वाटेतच मानसोपचारतज्ञांना सांगून धावतपळत मी वॉर्ड गाठला. काशीनाथ आजोबांनी फेकलेल्या ग्लासने उडत उडत माझे स्वागत

फेकलेल्या ग्लासने उडत उडत माझे स्वागत केले होते.

माझ्या मागोमाग लगेच पोहोचलेल्या मानसोपचारतज्ञांनी त्यांना आवश्यक ती औषधे दिली. रूग्णाला शांत केले. आणि मग काशीनाथ आजोबांना दुसरीकडे पाठविण्याचा विचार करु लागलो, चार पाच संस्थांना फोन करुन आजोबांना कोण ठेवून घेऊ शकतील याचा तपास मी सामाजिक कार्यकर्ती या नात्याने करु लागली.

काही सोपस्कार पूर्ण करुन आजोबांना एका संस्थेत काही दिवस ठेवावे असे ठरवून आम्ही त्यांना रवाना केले. सोबत त्यांचे उपचारांचे औषधही दिले. आणि आमची टीम थोडी शांत झाली.

दोन चार दिवस मधे गेले असतील. दुपारी त्या संस्थेतून फोन आला. "आजोबांची तब्येत परत बिघडली. त्यांना परत दवाखान्यात आणत आहोत. त्यांना ॲडमिट करण्याची गरज आहे. त्यांना काही शारिरीक त्रास होत होता. ते उभे ही राहू शकत नाही. त्यांना ॲडमिट करुन घ्या."

"ठीक आहे.तुम्ही आणा त्यांना. बघू काय होते ते" आजोबा परत आमच्याचकडे आले होते. मात्र परिस्थिती फारच खराब होती. त्यांना ॲडमिट करुन घेतले होते. संस्थेच्या कार्यकर्त्यांने मग माहिती दिली की, आजोबांच्या पिशवीची झडती त्यांनी आजोबांचे लक्ष नसतांना घेतली. आणि त्यात त्यांचे आधार कार्ड सापडले. त्यावरुन त्यांनी त्या पत्त्यावरील गावात शोध घेतला. पोलीसांची मदत घेऊन तो पत्ता शोधला गेला. आणि त्यांना आजोबांच्या कुटुंबियांचा फोन नंबर व इतर माहिती मिळाली.

नेमकी ही माहिती त्यांना रूग्णालयात पोहचता पोहचता कळली होती. पण आजोबा तर हे ऐकण्याच्या स्थितीतही नव्हते. त्यामुळे आजोबांच्या मुलींना ही परिस्थिती सांगून त्वरीत येण्यासाठी विनंती करण्यात आली. आजोबांची पत्नी, आणि दोन विवाहित मुली हे आजोबांचे कुटुंबिय आहेत.

फोनवर मात्र मोठी मुलगीच बोलत होती. आजोबांची अवस्था सांगूनही मी बहिणीला पाठविते. बघते जमेल तर, जे जमेल ते करु अशी उत्तरे देत होती. ते नेहमीच घर सोडून जातात, आम्ही काय त्यांच्या मागे मागे फिरु का ? असे बोलत होती.

फेकलेल्या ग्लासने उडत उडत माझे स्वागत केले होते.

माझ्या मागोमाग लगेच पोहोचलेल्या मानसोपचारतज्ज्ञांनी त्यांना आवश्यक ती औषधे दिली. रूग्णाला शांत केले. आणि मग काशीनाथ आजोबांना दुसरीकडे पाठविण्याचा विचार करु लागलो, चार पाच संस्थांना फोन करुन आजोबांना कोण ठेवून घेऊ शकतील याचा तपास मी सामाजिक कार्यकर्ती या नात्याने करु लागली.

काही सोपस्कार पूर्ण करुन आजोबांना एका संस्थेत काही दिवस ठेवावे असे ठरवून आम्ही त्यांना रवाना केले. सोबत त्यांचे उपचारांचे औषधही दिले. आणि आमची टीम थोडी शांत झाली.

दोन चार दिवस मधे गेले असतील. दुपारी त्या संस्थेतून फोन आला. "आजोबांची तब्येत परत बिघडली. त्यांना परत दवाखान्यात आणत आहोत. त्यांना ॲडमिट करण्याची गरज आहे. त्यांना काही शारिरीक त्रास होत होता. ते उभे ही राहू शकत नाही. त्यांना ॲडमिट करून घ्या."

"ठीक आहे.तुम्ही आणा त्यांना. बघू काय होते ते" आजोबा परत आमच्याचकडे आले होते. मात्र परिस्थिती फारच खराब होती. त्यांना ॲडमिट करून घेतले होते. संस्थेच्या कार्यकर्त्यांने मग माहिती दिली की, आजोबांच्या पिशवीची झडती त्यांनी आजोबांचे लक्ष नसतांना घेतली. आणि त्यात त्यांचे आधार कार्ड सापडले. त्यावरून त्यांनी त्या पत्त्यावरील गावात शोध घेतला. पोलीसांची मदत घेऊन तो पत्ता शोधला गेला. आणि त्यांना आजोबांच्या कुटुंबियांचा फोन नंबर व इतर माहिती मिळाली.

नेमकी ही माहिती त्यांना रूग्णालयात पोहचता पोहचता कळली होती. पण आजोबा तर हे ऐकण्याच्या स्थितीतही नव्हते. त्यामुळे आजोबांच्या मुलींना ही परिस्थिती सांगून त्वरीत येण्यासाठी विनंती करण्यात आली. आजोबांची पत्नी, आणि दोन विवाहित मुली हे आजोबांचे कुटुंबिय आहेत.

फोनवर मात्र मोठी मुलगीच बोलत होती. आजोबांची अवस्था सांगूनही मी बहिणीला पाठविते. बघते जमेल तर, जे जमेल ते करु अशी उत्तरे देत होती. ते नेहमीच घर सोडून जातात, आम्ही काय त्यांच्या मागे मागे फिरु का ? असे बोलत होती. "आजोबांचे शेवटचे काही तास बाकी आहेत.तुम्ही लवकर या" हे वारंवार सांगूनही त्यांची पत्नी व मुलगी

रूग्णालयात यायची भाषाच बोलत नव्हत्या. फोनवरच इतरही संभाषण ऐकू येत होते. आजोबांची पत्नी “चल आपण लवकर जाऊ” असे मुलीला म्हणत होती. मुलगी मात्र तिच्यावर डाफरत तिला नंतर जाऊ काही घाई नाही.” असे म्हणत होती. “तू जास्त कटकट करु नको” हे तिचे आईशी होत असलेले बोलणे फोनवर ऐकू येत होते.शेवटी वारंवार फोन केल्यामुळे त्या मुलीने आम्ही येत आहोत म्हणून सांगितले.

खरे तर हॉस्पीटलच्या ठिकाणापासून एक दीड तासाच्या अंतरावर त्यांचे गाव होते. आजोबांची पत्नी आणि मुलगी रूग्णालयात पोहोचेपर्यंत आजोबांची तब्येत बरीच ढासळली होती. त्यांना हायर सेंटरला पाठवावे या निष्कर्षावर डॉ.पोहचले होते. पण आता लगेच त्यांना हलवणे हे ही शक्य नव्हते. वाट बघण्याखेरीज काही उपायच नव्हता.

एकदाची ती मुलगी आणि आजोबांची पत्नी इतरही काही नातेवाईक रूग्णालयात येऊन पोहचले. आजोबांची ही मुलगी पोलीस दलात असल्याने तिने आल्यापासून तिचा रुबाब दाखवायला सुरुवात केली. रूग्णालयातील लोक, आणि त्या संस्थेतील व्यक्ती या सगळयांनी रूग्णाला (आजोबांना) कसे चुकीचे वागविले, त्यांच्यावर उपचार करण्यास वेळ का घालविला वगैरे विषयावर बोलून तिने रोष दाखविला.

डॉक्टरांनी मात्र, “तिने, इथे येण्यास का वेळ घालविला?” असे विचारता क्षणी ती नरमली. पत्नीने आता डॉक्टरांची बाजू घेतली. आम्हाला उशीरच झाला म्हणून दिलगिरी व्यक्त केली. सविस्तर चैकशी केल्यावर बाहेर आलेले सत्य वेगळेच होते.

आजोबांची ही पहिली पत्नी आहे. त्यांनी पूर्वी दुस-या एका स्त्री बरोबर लग्न केले आणि काही दिवस ते पहिली पत्नी सोडून दुसरीकडे राहू लागले होते. अर्थातच आजी आणि ही मुलगी उघडयावर पडले. आणि आजींनी लोकांकडे काम करुन मुलीला वाढविले. उच्च शिक्षण दिले आणि तिला पोलीसमध्ये नोकरी मिळाली. हे दिवस काढतांना दोघीही मायलेकी थकून गेल्या होत्या. आजोबांच्या दुस-या घरी ही सगळे उत्तम होते. परंतु ती पत्नी गेल्या वर्षी मरण पावली होती. त्यामुळे आजोबा यांच्याकडे परत रहायला आले होते. मोठया मित्रतवारीने पहिली पत्नी आणि मुलीने त्यांना ठेवून घेतले. पण मनात त्यांचा राग आहेच.

रूग्णालयात यायची भाषाच बोलत नव्हत्या. फोनवरच इतरही संभाषण ऐकू येत होते. आजोबांची पत्नी "चल आपण लवकर जाऊ" असे मुलीला म्हणत होती. मुलगी मात्र तिच्यावर डाफरत  तिला  नंतर जाऊ काही घाई नाही." असे म्हणत होती. "तू जास्त कटकट करु नको" हे तिचे आईशी होत असलेले बोलणे फोनवर ऐकू येत होते.शेवटी वारंवार फोन केल्यामुळे त्या मुलीने आम्ही येत आहोत म्हणून सांगितले.

खरे तर हॉस्पीटलच्या ठिकाणापासून एक दीड तासाच्या अंतरावर त्यांचे गाव होते. आजोबांची पत्नी आणि मुलगी रूग्णालयात पोहोचेपर्यंत आजोबांची तब्येत बरीच ढासळली होती. त्यांना हायर सेंटरला पाठवावे या निष्कर्षावर डॉ.पोहचले होते. पण आता लगेच त्यांना हलवणे हे ही शक्य नव्हते. वाट बघण्याखेरीज काही उपायच नव्हता.

एकदाची ती मुलगी आणि आजोबांची पत्नी इतरही काही नातेवाईक रूग्णालयात येऊन पोहचले. आजोबांची ही मुलगी पोलीस दलात असल्याने तिने आल्यापासून तिचा रुबाब दाखवायला सुरुवात केली. रूग्णालयातील लोक, आणि त्या संस्थेतील व्यक्ती या सगळयांनी रूग्णाला (आजोबांना) कसे चुकीचे वागविले, त्यांच्यावर उपचार करण्यास वेळ का घालविला वगैरे विषयावर बोलून तिने रोष दाखविला.

डॉक्टरांनी मात्र, "तिने, इथे येण्यास का वेळ घालविला?" असे विचारता क्षणी ती नरमली. पत्नीने आता डॉक्टरांची बाजू घेतली. आम्हाला उशीरच झाला म्हणून दिलगिरी व्यक्त केली. सविस्तर चैकशी केल्यावर बाहेर आलेले सत्य वेगळेच होते.

आजोबांची ही पहिली पत्नी आहे. त्यांनी पूर्वी दुस-या एका स्त्री बरोबर लग्न केले आणि काही दिवस ते पहिली पत्नी सोडून दुसरीकडे राहू लागले होते. अर्थातच आजी आणि ही मुलगी उघडयावर पडले. आणि आजींनी लोकांकडे काम करुन मुलीला वाढविले. उच्च शिक्षण दिले आणि तिला पोलीसमध्ये नोकरी मिळाली. हे दिवस काढतांना दोघीही मायलेकी थकून गेल्या होत्या. आजोबांच्या दुस-या घरी ही सगळे उत्तम होते. परंतु ती पत्नी गेल्या वर्षी मरण पावली होती. त्यामुळे आजोबा यांच्याकडे परत रहायला आले होते. मोठया मित्रतवारीने पहिली पत्नी आणि मुलीने त्यांना ठेवून घेतले. पण मनात त्यांचा राग आहेच.  परत आल्यावरही आजोबांनी दोघी मायलेकींना बराच त्रास दिला.  त्यामुळे त्या

दोघींनी आपापसात ठरवून त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे सुरु केले.

हळूहळू आजोबा एकटे पडू लागले. इतके की दिवसेंदिवस त्यांच्याशी कोणी शब्दही बोलत नसत. त्यांचे ताट वाढून ठेवले जाई. ते एकटेच बसत आणि जेवत. त्यांना एक वेगळी खोली दिलेली होती त्यात ते एकटेच बसत, झोपत, त्यांना बाकी घरात फिरण्यास मज्जाव होता. एकंदरीत त्यामुळे त्यांची प्रकृती शारिरीक व मानसिक दृष्टया खालावली. त्यात त्यांना विस्मरण सुरु झाले. त्यामुळे ते घरातून कधी कधी निघून जात. ज्यावेळी आठवण येत असे तेंव्हा परत येत. पण त्यांचा शोध घेण्यास कोणीही जात नव्हते. मुलगी पोलीस असूनही तिने कधीच त्यांच्या निघून जाण्याची तक्रार केली नाही की शोध घेण्याचा विचार केला नाही की त्यांचे उपचारांवर लक्षही दिले नाही.

या वेळीही तसाच काहीसा प्रकार घडला असावा. म्हणून यावेळी रूग्णलयातून फोन गेल्यावरही त्यांची मुलगी लक्ष देण्यास, त्यांची भेट घेण्यास तयार होत नव्हती.

खरे तर म्हातारे माणूस, जखमी झालेले, आणि आता तर अखेरच्या घटका मोजत असलेले वडील, म्हणून तरी एखाद्या सुहृदाने लक्ष दिले असते. पण मुलीला बापासाठी काहीच प्रेम उरले नव्हते की कर्तव्यही करायचे नव्हते? तिने एका शब्दात आजोबांना दुस-या रूग्णालयात उपचारार्थ नेण्यास स्पष्ट नकार दिला. आणि ती दूर कोप-यात जाऊन उभी राहीली.

आजोबांचे डोळे आतुरतेने त्या दोघींची वाट पाहत होते. डोळयांतून “कदाचित” पश्चातापाचे अश्रू येत होते. वर्षानुवर्षे न मिळालेल्या स्पर्शासाठी त्यांचे मन आतुरले होते. क्षणोक्षणी त्या डोळयांतली ज्योत विझतांना दिसत असल्याने, श्वास अतिशय थंड झालेला वाटल्याने डॉक्टर सुध्दा त्यांना आजोबांजवळ जाण्यास त्यांचा हात हातात घेण्यास सांगत होते. पण कठोर हृदयी पोलीस मुलगी स्वतःही जवळ जात नव्हती आणि वारंवार विनवणा-या आईलाही जवळ जाऊ देत नव्हती.

आजोबांच्या डोळयात निरोपाचे आर्जव दिसत होते. शेवटी आजीच्या हाताला धरून खेचत डॉक्टरांनी तिला आजोबांच्या पलंगाजवळ नेले. आजींनी आजोबांचा हात हाती घेतला. दुस-याच क्षणाला आजोबांची मान कलंडली. सात जन्माची साथ काही सेकंदात सुटली होती.

# मराठीच्या संवर्धनासाठी आणि मराठीजनांच्या प्रगतीसाठी

दीप्ती शिंदे दळवी



असे म्हणतात, भाषा जितकी वापरात असते तितकं तिचं संवर्धन आणि जतन उत्तमप्रकारे केले जाऊ शकतं. मराठी भाषाही या नियमाला अपवाद नाही. मराठी भाषेच्या स्थितीबाबत मत असणारे दोन प्रवाह आपल्याला समाजात दिसतात. एक प्रवाह, ज्याला वाटतं की मराठी भाषेची स्थिती ठीक नाही, ती खालावलेली आहे आणि दुसरा प्रवाह, ज्याला वाटतं की मराठी भाषेची स्थिती उत्तम आहे. तिला सद्यपरिस्थितीत कोणताही धोका नाही. मी एक व्यक्ती म्हणून थोडीबहुत पहिल्या प्रवाहात मोडते आणि त्याच अनुषंगाने आणि येऊ घातलेल्या राजभाषा मराठी दिनाचे औचित्य साधून हा लेख लिहीत आहे.

पहिल्या प्रवाहात मोडणाऱ्या बऱ्याच लोकाना असं वाटतं, की मराठी भाषेने अधिकाधिक प्रगती करावी आणि जागतिक पातळीवर एक महत्त्वाचं स्थान प्राप्त करून घ्यावं. पण हे स्वप्न जर सत्यात उतरवायचं असेल तर मुळात इंग्रजी भाषा आज जागतिक दर्जाची भाषा कशी काय झाली? ते संक्षेपात समजून घेणं गरजेचं आहे. इंग्रजी भाषा ही जगाच्या पाठीवर असंख्य लोकांच्या मुखी नांदते कारण ती ‘ज्ञानभाषा' आणि 'अर्थभाषा’ म्हणून विकसित होऊ शकली, ज्ञानभाषा म्हणजे ज्या भाषेतून ज्ञानदान आणि ज्ञानार्जन केलं जातं आणि अर्थभाषा या संकल्पनेचा अर्थ इथे ज्या भाषेच्या माध्यमातून अर्थ/ पैसा / धन वाहतं ती भाषा, असा घ्यावा.

एकोणिसाव्या शतकात युरोपात औद्योगिक क्रांतीला पूर आला. आणि हा पूर जगातील इतर देशांमध्येही हळूहळू पोहोचला. या स्थित्यंतराच्या काळातच ब्रिटनने अनेक देशांमध्ये आपल्या वसाहती स्थापन करून राज्यकारभार हातात घ्यायला हळूहळू सुरूवात केली होती. भारतही याला अपवाद नव्हता. तेव्हा भारतात कृषीप्रधान संस्कृती प्रामुख्याने रुढ होती. भारतासारख्या अवाढव्य देशात ब्रिटीश राजवटीला आपला राज्यकारभार सुरळीत सुरु ठेवण्यासाठी अनेक स्थानिक लोकांची गरज होती. पर्यायाने अनेक स्थानिक लोकांना सरकारी नोकऱ्यांमध्ये सामावून घेणं भाग होतं. परिणामी, भारतात अनेक व्यक्तीनी इंग्रजी शिकून ब्रिटिश

नोकरी पत्करली इंग्रजी अवगत केलेल्या या सरकारी नोकरांना कृषीक्षेत्रात रुजू असलेल्या भारतीयांपेक्षा अधिक आर्थिक लाभ होऊ लागला. या  बदलामुळे इंग्रजी भाषा म्हणजे आर्थिक लाभ हे समीकरण भारतीय जनमानसात रुजायला हळूहळू सुरुवात झाली. आणि या मानवनिर्मित समीकरणाने गेल्या दोन शतकात निसर्गनिर्मित नियमाची प्रतिमा धारण केली आहे, असं म्हणायला हरकत नाही.

आजही अनेक मराठी पालकांना आपल्या पाल्यांना मातृभाषेतून शिक्षण देण्याऐवजी इंग्रजीतून शिक्षण देणं जास्त योग्य वाटतं आणि ते असं का करतात? असा प्रश्न त्यांना विचारला की त्यांच्या तोंडून दोन कारणं निर्विवादपणे बाहेर पहतात ती म्हणजे मराठीतून शिकून हवी तशी आर्थिक प्रगती होत नाही आणि सध्या मराठी शाळांची स्थिती आश्वासाई  नाही आता मराठी शाळांची स्थिती चांगली नाही म्हणून मराठी पालक आपल्या पाल्यांना मराठी शाळेत पाठवत नाहीत की ते मराठी शाळेत पाठवत नाहीत म्हणून मराठी शाळांची स्थिती चांगली नाही, हा गुंता सोडवणं  म्हणजे कोंबडी आधी की अंडं या स्वरूपाचा आहे.

उपरोल्लेखित इंग्रजीच्या उदाहरणावरून एक गोष्ट स्पष्ट आहे की, एखाद्या भाषेचा आणि भाषिकांचा विकास करायचा असल्यास त्या भाषेचा वापर अधिकाधिक व्हायला हवा पण एखाद्या भाषेचा वापर अधिकाधिक तेव्हाच होतो जेव्हा- एकतर ती ज्ञानभाषा तरी असते, अर्थभाषा तरी असते किंवा प्रमुख व्यवहारभाषा तरी असते किंवा या तिन्ही प्रकारांत मोडते. मग मराठी भाषेला या तिन्ही निकषांत बसवायचं कसं? हा प्रश्न पुढे येतो याच उत्तर हे बहुस्तरीय आहे. त्याचा थोडक्यात उहापोह आपण करूयात.

सर्वात पहिले पाऊल आपल्याला उचलायला हवं ते म्हणजे मराठी भाषेबद्दल मराठी भाषिकांमध्ये असीम प्रेम, आदर आणि जिव्हाळा निर्माण करायला हवा. मराठी ही एक अभिजात भाषा असून ती खरंच किती समृद्ध आहे, परिपक्व आहे याची प्रचिती समाजाला आणून द्यायला हवी ह्यासोबत लागलीच दुसरे पाऊल उचलायला हवं ते राज्य आणि राष्ट्रीय सरकारने सामाजिक इच्छाशक्तीसोबतच राजकीय इच्छाशक्तीही निर्माण व्हायला हवी, राजकीय प्रयत्नांनी मराठी शाळांचे अद्ययावतीकरण करून घ्यायला हवं आणि मराठी भाषेतून अनेक .

रोजगार संधी उपलब्ध करून द्यायल्या हव्यात. एकदा मराठी भाषेतून अनेक रोजगार संधी उपलब्ध झाल्या म्हणजे एकदा मराठी भाषा ही अर्थभाषा होऊ लागली की मराठी पालकांनाही आपल्या पाल्यांना मराठीतून शिक्षण द्यावंसं वाटू लागेल या  योगे मराठी भाषा ज्ञानभाषाही होईल कारण अनेक पालक आपल्या पाल्यांना  मराठीतून शिकवण्यास उत्सुक आहेत म्हटल्यावर मराठीतून अधिकाधिक ज्ञाननिर्मितीही होऊ लागेल आणि आता मराठी ही अर्थभाषा आणि ज्ञानभाषा म्हणून विकसित होत आहे असं चित्र स्पष्ट झालं की ती अधिकाधिक वापरात येऊन व्यवहारभाषाही होईल. अशा पद्धतीने मराठीला सर्वांगीण प्रगतीची दारे खुली होतील.

पण ही झाली थिअरी, हिला सत्यात उतरवण्यासाठी अनेक सृजनशील आणि मराठी भाषेवर असीम प्रेम करणाऱ्या लोकांची गरज आहे. अशा अनेकजणांनी एकत्र येऊन मायबोली मराठीला जागतिक स्तरावर मानाचं स्थान प्राप्त करवून द्यावं, अशी सदिच्छा मी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या 27 फेब्रुवारी या जन्मदिनानिमित्त साजरा केल्या जाणाऱ्या राजभाषा मराठी दिनानिमित्त व्यक्त करते आणि हा लेख पुरा करते.

इति लेखसीमा !

# प्रेम




मैथिली अंजनकर

प्रेम - गवतफुलांचा तुरा
की कस्तुरीचा मळा
प्रेम -शांतवी तप्ततप्तशा
वैशाखाच्या झळा
प्रेम- नाही नुसते
मिळवणे गळ्यात गळा
निः स्वार्थ सुंदर प्रेमाला
दिव्य कांचनाची कळा
प्रेम- म्हणजे इंद्रधनू
आकाशात उमललेले
प्रेम -म्हणजे दीपदान
इंद्रायणीत तरंगलेले
प्रेम- म्हणजे सुगंध
दिसत नाही पण जाणवतो
ऋणबंधनाने जवळ
उभयता आणवतो
चिमूटभर प्रेमाची ही
आभाळगामी कथा
प्रेम -देते ऊर्जा
आयुष्याच्या रथा

# पेट्रोग्लिफ्स (कातळ शिल्प)



निता प्रकाश

कातळ म्हणजे दगड, शिल्प म्हणजे त्यावर चितारलेली चित्रे.

प्राग् ऐतिहासिक काळातील सांस्कृतिक संदर्भ म्हणून कातळ शिल्पांचे विशेष महत्त्व आहे. आधी काळापासून आदिमानवाने ही विविध शिल्पे दगडात करून ठेवलेली आहेत. ह्या कातळावर असलेल्या विविध चित्रातून काय व्यक्त होते हे सांगणे अवघड आहे. मात्र त्यावर असलेले विविध पक्षी,प्राणी किंवा फार अगम्य असे कोरून ठेवलेले नक्षीकाम आहे. अशा प्रकारच्या शिल्पांना रॉक आर्ट शैलोत्किर्ण किंवा पेट्रोग्लिफ्स नावाने ओळखतात. लेण्यांच्या भिंतीवर मुख्यत्वे असे कोरीव काम आढळते मात्र उघड्यावर आडव्या असलेल्या कातळावरील ही खोद चित्रे विशेषतः कोकणात पाहायला मिळतात.

ही खोदशिल्पे भव्य आकाराची असतात,वास्तविक आकाराशी साधर्म्य असणारी खूप भव्य अशीही खोद शिल्पे कातळसड्या चा कॅनवास म्हणून उपयोग करून कोरली आहेत.

मानवी जीवनाचा प्रदीर्घ इतिहासाचा कालखंड लक्षावधी वर्षांचा आहे. त्यातही हा कालखंड दोन भागात विभागला आहे. ज्यात प्राग्ऐतिहासिक (प्राचीन) आणि ऐतिहासिक (अर्वाचिन) अशा दोन भागात विभागला जातो. प्राग्ऐतिहासिक कालखंडाचे पाषाण युग ,ताम्र युग आणि लोहयुग असे तीन विभाग आहेत.

हा सर्वकाळ लेखन विरहित होता मानव हा इतर वन्य प्राण्यांप्रमाणेच रानटी अवस्थेत राहत होता या अवस्थेत असताना मानवाने आपल्या अस्तित्वाच्या खुणा गुहांच्या भिंतीवर पाषाणांवर खोदून ठेवल्या आहेत किंवा त्याच्या बुद्धीच्या क्षमतेनुसार त्या त्याने रंगवून ठेवले आहेत किंवा कोरून ठेवले आहेत ह्याच शिल्पांना रॉक आर्ट म्हणून ओळख मिळालेली आहे.

ही पेट्रोग्लिफ्स किंवा कातळ शिल्प कोकणच्या कातळ सड्यांवर आढळून आली. ह्या पेट्रोग्लिफ्स चा निर्माता कोण? यामागे त्यांचा उद्देश काय आहे आणि ही निर्मिती

कोणत्या कालखंडात केली आहे चित्र निर्मितीसाठी हत्यारे कोणती वापरली हे प्रश्न मनात निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. याबद्दल बऱ्याच जणांचा असा समज आहे की गुरे चरायला आणलेल्या गुराख्यांनी रिकाम्या वेळात विरंगुळा म्हणून ही शिल्पे कोरली असावी कारण कातळ शिल्पावर प्राणी, पक्षी यांची चित्रे कोरलेली आढळतात. मात्र ह्या शिल्परचनांची असलेली भव्यता मोठ्या भूप्रदेशावर असलेले शिल्परचनांचे अस्तित्व बघता केवळ गुराख्यांनी विरंगुळा म्हणून ती शिल्पे काढली असतील हे मानता येत नाही.

आणखी एक समज असा आहे की ह्या रचना पांडवकालीन आहेत, ज्या गोष्टींमध्ये गूढता आणि भव्यता असते आणि त्याची निर्मिती कोणी केली हे ज्ञात नसते अशा गोष्टी पांडवांनी लिहिल्या आहेत असा सार्वत्रिक समज असतो त्याला ही शिल्पे अपवाद कशी राहतील?

ह्या कातळ शिल्पाभोवती बरेच समज गैरसमज घोंगावत असतात, काही आख्यायिका ह्या शिल्पाभोवती रचल्या गेल्या असाव्यात असे वाटत राहते आणि शिल्पांशी यांचा संबंध आहे असे लक्षात येते. बरीच शिल्पे ही रत्नागिरी जिल्ह्यात आढळलेली आहेत, राजापूर येथे सापडलेल्या शिल्पांमध्ये काही प्राण्यांचे अस्तित्व दिसून येते मात्र त्यात दर्शविलेले प्राणी आता लुप्त झालेले आढळून येते. या परिसरातील कातळ इतर ठिकाणी आढळणाऱ्या कातळापेक्षा मऊ नरम आहे.

तेच कोकणात आढळणाऱ्या काही गावांमध्ये जांभ्याच्या कडक कातळावर शिल्पे कोरली आहेत. एकंदरीत शिल्परचनांचे भौगोलिक स्थान गाव वस्ती पासून दूर मोकळ्या आडव्या सड्यावर आहे. असे म्हटले जाते की प्रत्येक कालात्मक आविष्कार कलावंतांनी जीवनावर केलेले भाष्य ठरते, जीवनात घडलेल्या गोष्टींचे ते निरीक्षण असते. शिल्परचनेत आढळून आलेल्या मनुष्यप्राण्यां सकट सर्व प्राणी, पक्षी, जलचर यांच्या आकृत्या चिन्हांकित रेखाकृतीच्या स्वरूपात आहेत. या शिल्पांमध्ये सौंदर्याचा अभाव जाणवतो.

तज्ञांचा आणि अभ्यासकांचा शोध प्रवास अजूनही चालूच आहे नवनवीन ठिकाण आणि संदर्भ समोर येत आहेत तसेच या शिल्परचनांचा कालखंड आणि उद्देश शोधण्याचे मोठे आव्हान निर्माण झालेले आहे. ह्या शिल्पांचा पर्यटन स्थळ म्हणून पण विचार होत आहे.

या शिल्पांची माहिती समाजाला व्हावी तसेच त्याचे रक्षण व्हावे यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

ह्या कातळ शिल्पा मुळे कोकणच्या पर्यटनाला वेगळीच दिशा आणि भरीव चालना मिळेल. कातळ शिल्पांसाठी राज्य सरकारने विशेष निधी मंजूर केला असून त्या अंतर्गत त्यांच्या जतन संवर्धनाची योजना अमलात येणार आहे. कोकणवासियांनी आणि ते बघण्यास जाणाऱ्या पर्यटकांनी या जागतिक स्तरावरच्या अमूल्य ठेव्याची जाण ठेवून त्याचे संरक्षण करावे.

# “मी” मराठी

दिशा राजकारणे टिकेकर



लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी

जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी

धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी

एवढ्या जगात माय मानतो मराठी

मराठी साहित्यातील रत्न अशी ख्याती असणारे कवी, कथाकार, नाटककार, आणि समीक्षक विष्णू वामन शिरवाडकर म्हणजेच आपले लाडके कुसुमाग्रज. कुसुमाग्रजांनी मराठी भाषेतील साहित्यात तसेच मराठी संस्कृतीक क्षेत्रात फार मोठे योगदान दिले. कुसुमाग्रज हे आत्मनिष्ठ आणि समाजनिष्ठ जाणीव असणारे एक प्रतिभावंत साहित्यिक होते आणि म्हणूनच त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी 27 फेब्रुवारी हा त्यांचा जन्मदिवस ‘मराठी भाषा गौरव दिवस’ म्हणून आपण साजरा करतो.

मराठी कवितेला कुसुमाग्रजांनी एका वेगळ्याच उंचीवर नेले. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या ‘मराठी’ बोलीला साहित्यात विशेष असे स्थान मिळवून देण्यासाठी कुसुमाग्रजांचे मोलाचे योगदान आहे. 'मराठी' भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी समस्त मराठी लोकांची मागणी आहे. माय मराठीचा प्रत्येकालाच अभिमान आहे. “ लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी" सुरेश भटांची ही कविता आपल्याला मराठीचा अभिमान बाळगण्यास प्रेरित करते.

खरं तर मराठी भाषेचा उगम हा उत्तरेकडे झाला असून प्रामुख्याने मराठी भाषा भारताच्या दक्षिण भागात विकसीत झाली. काळाप्रमाणे ‘मराठी भाषा’ ही स्थळानुसारही बदलत गेली. मराठी बोलीभाषा आणि मराठी प्रमाणभाषा असेही याचे दोन भाग आहे. तरीही मराठी भाषा ही प्रत्येक मराठी माणसाचा अभिमान आहे.

आमच्या मनामनात दंगते मराठी

आमच्या रगारगात रंगते मराठी

आमच्या घराघरात वाढते मराठी

आमच्या फुलाफुलात नांदते मराठी

# जे मला वाटतंय ते
# तुला ही वाटतंय का?
## पल्लवी माने



जे मला वाटतंय ते तुला ही वाटतंय का? इतका साधा प्रश्न विसरतात बहुधा सगळे जण. नात्यांची गुंतागुंतच अशी आहे. आणि त्या गुंतावळीत फक्त घुसमट होत राहते. मला भूक लागलीय पण कशाची? हा प्रश्न दुसऱ्याला पडण्याआधी स्वतःला तरी विचारलाय का? सिस्टमच इतकी स्ट्रॉन्ग करुन ठेवलीय की त्या पलीकडे जाण्यासाठीच स्ट्रगल करावा लागतो आणि बिचारा तो किंवा ती किंवा तेच इतके थकलेले असतात की रोजची धावपळ करुन की मग फक्त औपचारिकता पाळली जाते .

पाल्य शाळेतून येतं मग पालक विचारतात कसा गेला आजचा दिवस ? मग 'छान' इतके नीटनेटके उत्तर येते. त्या छान शब्दामध्ये इतकेच असते की, मला आता प्लीज काही विचारु नका. आणि कदाचित आपल्यालाही समाधान हवे असते. पण खरंच रोज रोज आलबेल असते का हो ? कितीतरी स्ट्रगल असतो. आणि यात आपण आवडनिवड बाजूला नकळत ठेवत राहतो. आणि दुसऱ्या व्यक्तीला ही आपल्याप्रमाणे त्यात खेचत राहतो. बरं फक्त साम्पत्तिक स्थिति मोजता येते पण रोज जे आपल्याला छोटे छोटे हार्टअटैक येतात त्यांचे मोजमाप यात नसते.

कारण तेच आहे सिस्टम. ही सिस्टम समाजाने आखली आहे यात फक्त घर, गाडी, बैंक बॅलन्स अशा वित्तीय गोष्टींना प्राधान्य आहे. त्यात हे रोजचे हार्टअटैक कधी नाहीसे होतात हे कोणालाच कळत नाही. तात्विकतेचे डोस कोणालाच नकोयत कारण इतकं इंस्टंट सगळं उपलब्ध असताना का उगाच स्वतःला घामाघूम करायचं ना ? पिज्झा खात खात आपण ही आपलीच चव दुसऱ्यावर लादतोय कदाचित. त्याला शेतातले कणिस भाजून खायचे असेल किंवा त्याला टोस्ट सॅन्डविच हवेय ताटात पोळी भाजी वाढली जातेय पण जे मला वाटतंय ते तुलाही वाटतंय का ? हा साधा प्रश्न पडायला वेळ कुणाकडे आहे?